# <u>जाहीर प्रसिध्दी</u>

## सिंधुदुर्ग जिल्हा सागरी किनारी व्यवस्थापन नकाशे तयार करणे (CZMP)

सीआरझेड अधिसूचना 2011 अंतर्गत सिंधुदुर्ग जिल्हयाचे प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMPs) बनविण्याचे काम सेस, (CESS) केरळ यांचेमार्फत पूर्ण झालेले असून सीआरझेड अधिसूचना 2011 मधील परिशिष्ठ 1, परिच्छेद IV (अ) या तरतुदीनुसार सिंधुदुर्ग जिल्हयाचे सदर प्रारुप किनारा क्षेत्र व्यवस्थापन आराखडे (CZMPs) प्रसिध्द करणे व त्यावर 45 दिवसांत सुचना व हरकती मागविणे आवश्यक आहे. 45 दिवस पूर्ण झाल्यावर महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ व जिल्हाधिकारी यांनी त्या आठवडयात जनसुनावणी घेवून सर्व सुचना व हरकती राज्य शासनास इंग्रजीत पाठविण्यात याव्यात. असे निर्देश संचालक, MCZMA, पर्यावरण विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र.एमसीझेडएमए 2016/प्र.क्र.22/तां.क.4 दिनांक 21/8/2017 अन्वये या कार्यालयास दिलेले आहेत त्याअनुषंगाने MCZMA, पर्यावरण विभाग मंत्रालय मुंबई यांजकडील अधिसूचना व त्यांनी या कार्यालयास पाठविलेले 21 प्रारुप आराखडे या कार्यालयाच्या बेबसाईटवर (<u>www.sindhudurg.nic.in</u>) प्रसिध्द करणेत येत आहेत.

तरी तरी सदर नकाशांचे अवलोकन करुन यासंदर्भात काही अभिप्राय अथवा हरकती असल्यास 45 दिवसांचे आत (5 ऑक्टोबर 2017 ) पूर्वी निम्न स्वाक्षरीत यांच्या कार्यालयाकडे अभिप्राय अथवा हरकती सादर कराव्यात, जेणेकरुन सदरच्या अभिप्राय अथवा हरकती MCZMA ,पर्यावरण विभाग मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करता येतील. मुदतीनंतर या कार्यालयास प्राप्त होणा-या अभिप्राय/ हरकती यांचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सोबत- 1) MCZMA, पर्यावरण विभाग मंत्रालय मुंबई यांजकडील दिनांक 21/8/2017 रोजीची अधिसूचना.
2) प्रारुप CZMP आराखडे 21 प्रती.

NO.REV 2603/1/2016
जिल्हाधिकारी कार्यालय, सिंधुदुर्ग
दिनांक 22/8/2017

जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग